D:\15) Sand\Sand Auction 2018-19.Programme.doc

<u>जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा</u>

**सन 2021-2022 करिता बुलडाणा जिल्हयातील रेतीस्थळांचा लिलाव राज्य पर्यावरण विभागाच्या अनुमतीच्या अधीन राहुन ई निविदा नि ई लिलाव करण्याचे निश्चित केलेले आहे.**

## <u>ई-निविदा व ई-लिलाव सूचना</u>

सन 2021-22 करीता बुलडाणा जिल्ह्यातील महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र गौखनी-100219/प्र.क्र.9/ ख-1, दिनांक 3 सप्टेंबर, 2019 मधील तरतुदी व अटी शर्तीनुसार तसेच **राज्यस्तरीय पर्यावरण विभागाच्या अनुमती प्राप्त होण्याचे अधीन राहुन** ई-निविदा व ई-लिलाव घेण्यात येत असल्याबाबत याव्दारे जाहिर सूचना देण्यात येत आहे.

१) ई – निविदा व ई- लिलाव हे राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यनिर्धारण प्राधिकरणाने मंजूर केलेल्या पर्यावरणअनुमतीच्या अधीन राहुन करण्यात येत आहेत.

२) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणा-या व्यक्ती /संस्था/फर्म/कंपनी यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रु.10.00 लाखापेक्षा कमी असल्यास रु. 2000/- व रु. 10.00 लाखापेक्षा जास्त असल्यास रु. 5000/- जिल्हाधिकारी यांचे नावाने आरटीजीएस करावी लागेल.

३) लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन घेण्यात येणारी रक्कम नेट बॅकीग,क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, (एनईएफटी / आरटीजीएस ) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांच्या खात्यात जमा करावी लागेल.

४) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणा-या व्यक्ती /संस्था/फर्म/कंपनी यांनी आरटीजीएस / एनईएफटीद्वारे देय रक्कम आपल्या बिडरआयडीमध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ करणे आवश्यकआहे. म्हणूनच कृपया करुन आपण पेमेंट गेटवेवर आरटीजीएस / एनईएफटी पर्यायाद्वारे कागदपत्रशुल्क / ईएमडी देयक भरण्या आधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठविण्याची नोंद घ्यावी.

५) सर्वोच्च ई - निविदा, ई – लिलाव धारकाने सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, सर्व्हेक्षण शुल्क, भूपृष्टभाडे, भाडेपट्टा शूल्क तसेच मोजणी नकाशा जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल.

६) शासन निर्णय क्र गौखनी-100219/प्र.क्र.9/ ख-1, महसूल व वन विभाग, मुंबई 32, दिनांक 3 सप्टेंबर, 2019 मध्ये नमूद सर्व तरतूदी आणि अटी व शर्ती निविदाधारक/लिलावधारक यांना बंधनकारक राहतील. त्याच प्रमाणे पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जवाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील.

७) राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यनिर्धारण प्राधिकरणाने ज्या दिनांकापर्यंत मंजूरात दिली असेल/किंवा रेती धोरण दिनांक ०३.०९.२०१९ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ३० सप्टेंबर यामध्ये जी दिनांक आधी असेलत्याच दिनांकापर्यंत वाळूघाटाची अंतिम मुदत (कालावधी)राहील. सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (सरंक्षण) अधिनियम १९८६ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

८) सदर ई लिलाव राज्यस्तरीय पर्यावरण विभागाच्या अनुमतीच्या अधीन राहुन घेण्यात येत असल्यामूळे सर्वोच्च बोली बोलणा-या ई लिलाव धारकाला मंजूर करण्यात आलेल्या रेतीघाटाला पर्यावरण अनुमती प्राप्त न झाल्यास मंजूर रेतीघाट हा रदद समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) **ई लिलावामध्ये मंजूरात मिळालेल्या रेतीघाटाला पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकाला संबंधीत रेतीघाटातुन रेती/वाळुचे उत्खनन करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

## लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता -

(अ) कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी/संस्था लिलावात भाग घेण्यास खालील कारणास्तव अपात्र असतील:-

1. वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतिमंद व्यक्ती किंवा
2. केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केलेल्या व्यक्ती किंवा
3. गौणखनिजाच्या स्वामित्वधनाचीथकबाकीकिंवामृतभाटकाची रक्कम थकविण्यांत आली असणारी व्यक्ती/संस्था किंवा
4. नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाची अवैध उत्खनन किंवा वाहतूक केल्याबाबत शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती
5. लगतपूर्वीच्या आर्थिक वर्षातील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यास (व्यक्तीसाठी रेतीगट मूल्याच्या किमान 5 टक्के व संस्था व कंपनीसाठी रेतीगट मूल्याच्या किमान 10 टक्के एवढी उलाढाल असणे आवश्यक राहील)

(ब) लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमितआयकर भरत असल्याचा पुरावा,पॅन क्रमांक व वस्तू व सेवाकर विभागाचा टीन क्रमांक असणे आवश्यक राहील.

(क) लिलावात भाग घेणा-या व्यक्ती /संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून लिलावाच्या अपसेट प्राईसच्या रकमेच्या 25 टक्के रक्कम भरावी लागेल.

बुलडाणा जिल्ह्यातील **25 रेतीघाटांकरीता** ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेद्वारे रेती/वाळू निर्गती करणेसाठी निविदासह आवश्यक माहिती https://buldhanaco.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या www.buldhana.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. तसेच रेतीघाटा संबंधीचे लिलावाची सुचना, लिलावाच्या अटी व शर्ती, जिल्हयातील सर्व रेतीघाटांची व त्यांचे ऑफसेट प्राईसचे विस्तृत माहितीचे विवरणपत्र व अटी/शर्तीची सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म विभाग), सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इच्छुक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्याकरीता डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. https://buldhanaco.abcprocure.com ह्या वेबसाईटवर संगणकीय नोंदणी (ऑनलाईन रजिष्ट्रेशन)करणे आवश्यक आहे. तसेच ई-मेल आयडी, आधार कार्ड, पॅन कार्ड, जि.एस.टी. सर्टीफिकेट, स्वयंघोषणापत्र, अपलोड करुन रजिस्ट्रेशन करता येईल.

अटी व शर्तीनूसार ई-निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तींना प्रत्येक रेतीघाटाकरीता नोंदणी फी रु.3658/- भरावी लागेल. तसेच 1) ज्या वाळू गटाची हातची किंमत रु.10 लाख पेक्षा जास्त आहे त्याकरीता निविदा अर्ज फी रु. 5000/- अधिक प्रोसेंसिंग फी रु.1947/- एकुण रु.6947/- (ना-परतावा) भरावे लागेल, 2) ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10 लाख पेक्षा कमी आहे. त्याकरिता निविदा अर्ज फी रु. 2000/- अधिक प्रोसेंसिंग फी रु.1947/- असे एकुण रु. 3947/-( ना-परतावा) ई-पेमेंट जसे :- नेट बँकींग/ क्रेडीट कार्ड/ डेबिट कार्ड (एनईएफटी/ आरटीजीएस) पध्दतीने भरावे लागेल.

तसेच अटी व शर्तीनुसार ई-निविदा सोबत 1) ज्या वाळूगटाची अपसेट प्राईसच्या 25% अनामत रक्कम (EMD) वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जमा करावी लागेल. आणि यशस्वी लिलावधारकास उर्वरीत रक्कम वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जमा करावी लागेल. 2) ज्या कंत्राटदारांनी ई-निविदा ज्या रेतीघाटासाठी भरली असेल त्या रेतीघाटासाठी ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीमध्ये भाग घेता येईल.

D:\15) Sand\Sand Auction 2018-19.Programme.doc

निविदेसोबत ई-मेल आयडी, आधार कार्ड, पॅन कार्ड, जि.एस.टी. सर्टीफिकेट, स्वयंघोषणापत्र, इत्यादी कागदपत्रांची स्कॅन कॉपी जोडणे आवश्यक आहे. तसेच सदरहू मूळ कागदपत्रे ऑन लाईन रजिस्ट्रेशन बंद झाल्यानंतरचे दुस-या दिवशी खनिकर्म विभागात सादर करणे बंधनकारक आहे.

वाळु/रेती लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलावाचा कालावधी 30 सप्टेंबर 2022 पर्यंतचा कालावधी राहील. तथापि अशा पध्दतीने लिलावाचा कालावधी निश्चित करत असतांना पाण्याखालील वाळूगटामध्ये दिनांक 10 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही.

ई-निविदा व ई-ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू निर्गती करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

| दिनांक | तपशिल |
|---|---|
| ०४/१२/२०२१ | **दुपारी 1.00 वाजेपासून ऑनलाईन रजिस्ट्रेशन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल.** |
| ०७/१२/२०२१ | **प्रशिक्षण वर्ग दुपारी 3.00 वाजता Online होईल.** |
| १३/१२/२०२१ | **सायंकाळी 6.00 वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल.** |
| १४/१२/२०२१ | **सकाळी 10.00 वाजेपासून ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने भरणे सुरु होईल.** |
| २०/१२/२०२१ | **सायंकाळी 6.00 वाजता ऑनलाईन ई-निविदा भरणे बंद होईल.** |
| २१/१२/२०२१ | **ई-लिलाव (ई-ऑक्शन) खालीलप्रमाणे करण्यात येईल.<br>रेतीघाट क्रमांक 1 ते 12 : सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत<br>व रेतीघाट क्रमांक 13 ते 25 : दुपारी 2.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत<br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनीट प्रमाणे 5 (पाच) वेळा वाढ करण्यात येईल.** |
| २१/१२/२०२१ | **उक्त ई लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर दुपारी 5.30 वाजता ई-निविदा डाऊनलोड करुन जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणाचे सभागृहात येथे उघडण्यात येईल व ई निविदा / ई लिलाव यातील महत्तम रकमेचा लिलाव मंजूर करण्यात येईल.** |

जिल्हयातील प्रस्तावित वाळूगटाची ई-लिलाव बोली कमीत **कमी रुपये 10,000/-** ने व त्यापुढे कितीही रकमेने बोलता येईल. सर्वोच्च ई-निविदा/ ई-ऑक्शन धारकास आधार कार्ड, पॅन कार्ड, जि.एस.टी. सर्टीफिकेट, स्वयंघोषणापत्र, लिलाव प्रक्रीया संपताच जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म शाखा) सादर करावी लागेल.

ई-निविदा अथवा ई-ऑक्शन स्विकारणे किंवा नाकारणे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवणे संबंधीचा अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी राखुन ठेवला आहे.

**टिप:** जिल्हयातील हर्रासास ठेवलेल्या रेतीघाटाची माहिती https://buldhanaco.abcprocure.com या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) व www.buldhana.nic.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे. **ई-निविदा किंवा ई-ऑक्शन बाबत कोणत्याही अडचणीकरीता पुढील दुरध्वनी/ भ्रमणध्वनी किवा ई-मेल वर संपर्क साधावा :**

**Digital Signature Certificate and for First level Approval contact on below nos :-**

| Sr.No | Person Name | Mobile No. | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | Sonu Tank | +91 6359576791 | sonu@abcprocure.com |
| 2 | Satabdi Dey | +91 9714297481 | info@abcprocure.com&himalay@abcprocure.com |

**For any technical support while bidding in e-Tender & e-Auction, please call on below nos.**

**Escalation Matrix**

| Name | Cell No | Email ID | Common email Id for all |
|---|---|---|---|
| नंदन वालेरा | 9081000427 | nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| प्रतिक पटेल | 7622000287 | pratik.patel@eptl.in | |
| फहादखान | 9904406300 | fahad@eptl.in | |
| धरम राठोड | 9374519754 | dharam@eptl.in | |
| For e-Payment Related support, Mail to payment@eptl.in and contact to above given nos. | | | |

बुलडाणा

दि. 02/12/2021

**जिल्हाधिकारी, बुलडाणा**

**सन 2021-2022 करिता दिनांक 30 सप्टेंबर, 2022 पर्यंत मुदतीसाठी**

**शासन निर्णय दिनांक 03/09/2019 अन्वये जिल्हयातील सन 2021-2022 या वर्षाकरीता हर्रासयोग्य एकुण 25 रेतिघाटाचा SEIAA व SEAC समितीचे पर्यावरण अनुमतीस अधिन राहुन दिलेल्या जिल्हयातील 25 रेतीघाटांचा ई निविदा नि ई लिलाव करण्याचे निश्चित केलेले आहे.**

**(अ) सर्वसाधारण निर्देश अटी आणि शर्ती**

1. लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक असणा-या व्यक्ती / संस्थेस **परिशिष्ट** 1मध्ये दिलेले स्वयंघोषणापत्र स्वाक्षरीसह दिल्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही.
2. लिलावात सहभागी होणाऱ्या व्यक्ती/संस्था नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा असणे, पॅन क्रमांक, GST Certificate, Digital Signiture नोंदणी करताना अत्यावश्यक आहे.
3. सदर ई-लिलाव राज्यस्तरीय पर्यावरण विभागाच्या अनुमतीच्या **अधीनराहुन** घेण्यात येत असल्यामूळे सदर रेतीघाटाला पर्यावरण अनुमती प्राप्त न झाल्यास सदर रेतीघाटाचा लिलाव हा **आपोआपच रद्द होईल** व सदर रेतीघाट सर्वोच्च बोली बोलणा-या ई-लिलाव/ निविदाधारकाला मंजूर केला जाणार नाही व लिलावधारकाला संबंधीत रेतीघाटातुन रेती/वाळुचे उत्खनन करता येणार नाही याची नोंद घ्यावी.
4. सदर लिलाव हा राज्यस्तरीय पर्यावरण समितीची अनुमती प्राप्त होण्याचे अधीन राहून घेण्यात येत असल्याने, वाळुगटास राज्यस्तरीय पर्यावरण समितीची अनुमती प्राप्त झाली नाही तर लिलाव रद्द झाल्याने लिलावप्रक्रियेत सहभाग घेणा-यांची इसारा रक्कम परत होईल.
5. लिलावाच्या निविदा सादर करू इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रु.10.00 लाखापेक्षा कमी असल्यास रु.2000/- व रु 10.00 लाखापेक्षा जास्त असल्यास रु.5000/- इतकी रक्कम भरावी लागेल.
6. लिलावात सहभागी व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून अपसेट प्राईजच्या 25% रक्कम भरणे अत्यावश्यक आहे.
7. सर्वोच्च बोलीचा देकार / निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या 48 तासाच्या आत जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावातील बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित येईल. तसेच, आदेशात नमुद केलेली सर्वोच्च बोलीच्या अनुषंगाने उर्वरित रक्कम व इतर अनुषंगीक संपुर्ण रक्कम डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेटद्वारे Online **संगणकीय प्रणालीद्वारे** प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचे खात्यात भरावी लागेल.
8. लिलावात सहभागी होऊ इच्छिणा-या व निविदा भरू इच्छिणा-या प्रत्येक व्यक्ती/संस्थेला निविदा सादर करतांना इसारा रक्कम RTGS/NEFT द्वारे भरावी लागेल.
9. आयकर अधिनियमातील तरतूदीनूसार लिलावातील सर्वोच्च किमंतीच्या अनुषंगाने टिडीएस देणे लिलावधारकांस बंधनकारक राहील. तसेच त्यांना वस्तू व सेवाकर खात्याकडे नियमानुसार वस्तू व सेवाकर शासन जमा करणे बंधनकारक राहील.
10. यशस्वी लिलावधारकास वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे लिलावाची रक्कम रु.10 लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रकमेच्या 0.1 टक्का किंवा रु. 100/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क व लिलावाची रक्कम रु. 10 लाखापेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेवर 0.2 टक्के मुद्रांक शुल्काची रक्कम भरणे आवश्यक राहील.
11. लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या 20 % एवढी रक्कम अनामत रक्कम (SecurityDeposit) म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने / परवानाधारकाने लिलावाच्या/परवान्याच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन

केल्यास, लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

12. लिलावधारकाने/परवानाधारकाने जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले स्वामित्वधनाच्या 10 टक्के इतकी (सर्वोच्च बोलीच्या 10%) रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान करिता अंशदानाची रक्कम म्हणून अदा करणे बंधनकारक राहील.

13. लिलावधारकांस सर्वेक्षण शुल्कापोटी रूपये 5000/-इतक्या रकमेचा उपसंचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नागपूर यांचे नावे काढण्यात आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) सर्वेक्षण शुल्कापोटी जमा करावा लागेल.

14. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी इ. प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.यांत्रिक साधनाद्वारे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास ते उत्खनन अवैध समजून दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

15. रेल्वेपुल व रस्तेपुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स अंतर सोडूनच वाळू/रेतीचे उत्खनन करण्यात यावे.

16. लिलावधारकास निश्चित करून दिलेल्या गटापासून 500 मिटर अंतरापर्यत किंवा रेतीघाटावरून नजरेच्या टप्प्यात येणा-या क्षेत्रात रेतीचे अवैध उत्खनन होत असल्यास लिलावधारकाने तात्काळ संबंधित तहसिलदार यांना लेखी कळविणे आवश्यक आहे. असे न केल्यास सदर उत्खनन लिलावधारकांनेच केले आहे असे गृहीत धरून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

17. Project Proponent म्हणून प्रकरण परत्वे राज्यस्तरीय समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणा-या अधिका-यांचे नावाने पर्यावारण अनुमती प्राप्त झालेली आहे. परंतु संबंधीत लिलाव धारकांकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्यास पर्यायाने पर्यावरण अनुमतीमधील नमुद सर्वसाधारण अटी व शर्ती तसेच विशिष्ट अटी व शर्ती रेतीघाट धारकांस बंधनकारक राहतील व त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी रेतीघाट धारकांची राहील. त्यामुळे जे वाळूगट लिलावात जातील त्यांच्या बाबतीत संबंधीत लिलावधारकांच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग राहील. परंतू पुढील कालावधीसाठी पर्यावरण अनुमतीचा प्रस्ताव Project Proponent म्हणून राजस्तरीय पर्यावरण समितीसमोर सादर करणे व अशी पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणे ही संबंधीत लिलावधारकाची जबाबदारी राहील. लिलाव धारकाच्या चुकीमुळे पर्यावरण अनुमती प्राप्त न झाल्यास संबंधीत लिलाव धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच संबंधीत लिलाव धारकावर त्या वर्षीच्या हातच्या किमती ऐवढा दंड आकारण्यात येईल व त्याचे नाव काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

18. पर्यावरण विभाग मुंबई,SEIAA या समितीची बैठक क्रमांक --------- दिनांक --------- मध्ये प्रदान केलेल्या मान्यतेनूसार तसेच पर्यावरण विभाग यांचेकडील पर्यावरण नाहरकत दिनांक ---------- मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकांस बंधनकारक असेल .लिलावधारकास पर्यावरणअनुमतीतअंतर्भुतअटी व शर्तीचा अनुपालन अहवाल संबंधीत तहसिलदार व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सादर करावयाच्या नियतकालिक अहवालासोबत सादर करावा लागेल व जिल्हा प्रशासन अटी /शर्तीच्या अनुपालनाची शहानिशा करेल.अटी शर्तीचे अनुपालन केल्याचे न आढळल्यास घाटधारकांवर पर्यावरण कायदा महसूल व अन्य तत्सम कायद्यानुसार कार्यवाही करण्यातयेईल.

19. लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाचा असून सदर निर्णय संबंधीतास लिलाव प्रक्रियेनंतर कळविण्यात येईल .

20. लिलावधारकास त्याच्या नावाने लिलाव अंतिम झाल्यास 100/- शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर वाळू लिलावाबाबतच्या अटी व शर्ती पालन करने याबाबतचे करारनामा/ शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

21. वाळू/ रेती (ठेका) लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येइल अशा वेळेस त्या रेती/ वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यांत येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

22. लिलावधारकास मंजुरी आदेश प्राप्त झाल्यावर संबंधीत उपअधिक्षक, भूमी अभिलेख / तहसिलदार यांचे कडून मंजुर क्षेत्राचे सिमांकन व ताबा घेतल्याशिवाय उत्खननास सुरुवात करता येणार नाही.

23. घाटधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

24. घाटधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबत दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

25. लिलावधारकांस वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

26. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

27. लिलावधारक रेती/वाळू ची वाहतूक करतांना वाहनासोबत सक्षम प्राधिका-याने यथोचितरित्या प्रमाणित केलेली वाहतूक पास ठेवील. वाहतूक पास तीन प्रतीत असेल, वाहतूक पासची मुळ प्रत अशा वाहतूक पासमध्ये विनिर्दिष्टीतकेलेल्या ठिकाणी असे गौण खनिज उतरवून घेतल्यानंतर खरेदीदारांकडे सूपूर्त करण्यात येईल. आणि लिलावधारक एक प्रत स्वत:जवळ ठेवील. तसेच एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करेल. वाहतूक पास वाहनासोबत नसल्यास त्या वाहनातून आणलेले गौण खनिज बेकायदेशीरü व अनाधिकृत असल्याचे समजले जाईल. आणि त्याबाबत लागु असलेल्या कायद्याच्या प्रचलित तरतूदीनूसार कार्यवाही करण्यांत येईल.

28. लिलावधारकांने त्याच्या लिलावस्थळातील रेती / वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वाहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक करावी. वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार कारवाई करावी. दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल.

29. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) नियम, 2013 तसेच शासन निर्णय क्र.गौखनि-10/0219/ प्र.क्र.9/ ख-1, दिनांक 03.09.2019, आणि शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले अधिनियम, नियम, परिपत्रके यामधील सर्व तरतुदीचे तंतोतंत पालन करणेची लिलावधारकाची जबाबदारी राहील. तसेच पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली (MOEF & C.C.) या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाचे पालन करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

30. वाळू वाहतुकीसाठी केंद्र शासनाच्या दिनांक 15.01.2016 च्या अधिसूचनेतील परिशिष्ट 12 मधील सनियंत्रण प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

31. रेती/वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

32. लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा / वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

33. रेतीचे / वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काहि प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने / ठेकेदाराने विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

34. करारपत्रात नमुद केलेल्या वाळूच्या परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व करारपत्राकांत नमूद असलेल्या परिमाणापेक्षा अधिक उत्खनन लिलावधारकास करता येणार नाही.

35. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातुन करारात नमुद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलवून दिला जाणार नाही. तसेच लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू/रेती स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील. वाळू/रेती गटाचा गटाचा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलवून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

यासोबतच लिलावधारक यांनी खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

अ) प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

ब) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/ रेतीची साठवणूक, ई-निवीदा/ ई-लिलाव ज्या जिल्हाधिकाऱ्यानी / अपर जिल्हाधिकाऱ्यानी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ई-निवीदा/ई-लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. त्यानुसार ते ठिकाण नदीपात्रापासून नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करावे.

क) सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जावू शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/लोखंडी/ भिंतीचे/ दगडाचे कुंपन किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक/ चर खोदणे आवश्यक असेल.

ड) वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे. त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. व अशा वाळूच्या/ रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत ई-निवीदा धारकास / ई-लिलावधारकास कोणताही हक्क सांगतायेणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही.

इ) मंजुर झालेला वाळू/ रेतीसाठा मंजुर करण्यात आलेल्या एकाच ठिकाणी करणे बंधनकारक राहिल.तसेच मंजुर डेपो/साठ्याचे स्थळ सक्षमअधिका-याच्या परवानगी शिवाय कोणत्याही परिस्थितीत बदलवता येणार नाही.

36. शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारीही घेता येणार नाही.

37. लिलावधारकाने त्यांना मंजुर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केले आहे,त्याबाबतचे विवरणपत्र **परिशिष्ट-2** मध्ये दि. 1 ते 15 पर्यंतचे विवरणपत्र दि.20 तारखेपर्यंत तसेच दि.16 ते दि.30/31 पर्यंतचे पाक्षीक विवरणपत्र दरमहिन्याचे 5 तारखे पर्यंत विहित नमुन्यात व विहीत वेळेत संबंधित तहसीलदार / उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर करुन त्याची प्रत जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यातयेईल.

38. लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने धूप हाऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन

करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

39. एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव रेतीचा / वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नविन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

40. अवैध वाळू/रेतीसाठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 मधील नियम 48(7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

41. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची नोंदणी महाखनिज प्रणालीवर करणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

42. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकांवर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडुन वसूल करण्यात येईल.

43. पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) नुसार पर्यावरण समतोल करीता आवश्यक खर्चाएवढी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात यावी व लिलावधारकाने EMP नुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी करुन (MOEF & CC) चे नाहरकत प्रमाणपत्र (Compliance Report) सादर केल्यानंतर उक्त रक्कम परत करण्यात येईल.

44. लिलावधारकाने/परवाना धारकाने त्याला मंजुर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चितकरुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहित केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

45. माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र. 19628-1629/2009 मध्ये दि. 27/02/2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक 03/09/2019 नुसार तहसिलचे तांत्रिक उपसमितीने संबंधीत रेतीघाटाच्या थराची जाडी निश्चित केली आहे व पर्यावरण मंजुरी आदेशामध्ये जी खोली शिफारस आहे, त्यामर्यादेतच रेतीघाटाचे उत्खनन करता येईल.

46. लिलावधारकाने वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही,याबाबतयोग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

47. लिलावधारकास लिलावात मंजुर केलेल्या परिमाणाइतकेच वाळूचे उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

48. वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधी व्यतीरिक्तच्या काळात केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल

49. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.
50. सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.
51. खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमीनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, वाळू/रेती काढता येणार नाही तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही.
52. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळू गटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवून विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रालीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज पंधरवाडी अहवालासोबत तहसिलदार यांना न चुकता सादर करावे.अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
53. वाळु उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजूच्या परिसरात पुरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजुर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरु करणे वत्याबाबतसक्षमप्राधिका-यासलेखीकळविणेबंधनकारकआहे.
54. अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याकरिता लिलावधारकांनी त्यांना देण्यात आलेले रेतीघाटच्या परिसरातील जे रेतीघाट लिलावात जाणार नाही, त्या रेतीघाटात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी जो खर्च शासनास येईल त्याबाबतचा आर्थिक भार त्यांनी (लिलावधारक / परवानाधारक) उचलावा. जेणेकरुन अवैधपणे रेती उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी होऊन अधिकृत लिलावधारकाकडून रेतीची खरेदी नियमानुसार होईल.
55. ग्रामपंचायतीने वाळूच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी लिलावधारकांमार्फत लिलावाच्या अटी व शर्तीप्रमाणे उत्खनन होत आहे किंवा कसे, याची पाहणी करणे व अटी व शर्तीचे उलंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक राहील.
56. लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटांचा लिलाव हाऊ शकत नाही. अशा प्रकारे संगणमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.
57. पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात येईल, तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48(7) व (8)मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.
58. वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे शासनाच्या महाखनिज प्रणालीवरील वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजुन त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48(7) व (8)मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.
59. अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये संबंधीत ठेकेदार / लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्या विरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधितांविरुध्द भारतीय

दंड विधी संहिता कलम, 34, 114, 379, 392, 393, 394, 396 इ. कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48 (7) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम 48(8) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल.

60. अवैध वाळू उत्खनन व वाहतुक प्रकरणी कारवाई करतांना महसुल अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटीत गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटीत गुन्हेगारी विरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा 'घालण्याबाबत आधिनियम, 1981 अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.
61. लिलावधारक/परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतूदींचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.
62. प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी 24/7 छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसवण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा ज्याठिकाणीवाहतूकीच्या साधनात वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसवण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील.
63. लिलावधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी /विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वनविभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर 15 दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.
64. CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, मंजूर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस CCTV कॅमेरा बंद होता, तवढे दिवस सरासरी उत्खनन केले, असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतीब्रास रक्कम परिगणीत करुन त्या दराने CCTV कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रकमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात यावी. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असला तरीही पूर्ण दिवसासाठी CCTV बंदअसल्याचे समजून वरील प्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसूली करण्यात यावी.
65. रेतीची वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनावर GPS बसविणेआवश्यक राहील. रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनामध्ये GPS न बसविल्यास बारकोड टि.पी. चे Invoice Generate होणार नाही.
66. लिलावधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करुन दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल.
67. वाळुचे अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या इतर वाहनांचे उदा.ट्रक, टेंपो, हापटन, हायवा इ.वाहनांचा परवाना निलंबीतकरण्यासाठीप्रादेशीक परिवहन प्राधिकरण (Regional Transport Authority) यांचेकडेप्रस्तावितकरण्यातयेईल.
68. वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक 03/09/2019 मधील अटी व शर्ती तसेच निविदा सूचनेतील अटी व शर्तीनुसार लिलावधारकाने लिलावात भाग घेण्यापूर्वी, वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची आहे. त्यामुळे वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू आहे, वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा कारणास्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

69. वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर दिनांक 03/01/2018 च्या वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरणातील काही तरतुदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी दिनांक 03/09/2019 च्या वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरणातील तरतूदी अंतिम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
70. लिलावधारकाने वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण दिनांक 03.09.2019, पर्यावरण अनुमती अधिसूचना दि. 01/09/2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.
71. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती तहसिलदार / जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
72. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका नैसर्गिक कारणास्तव, न्यायालयीन प्रक्रियेत किंवा नियमांचे उल्लंघन प्रकरणी रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.
73. रेती वाहतूकीकरिता वापरण्यात येणारे रस्ते / मजुर / वाहने यांचे देखरेखीची / संरक्षणाची जबाबदारी लिलावधारकाची राहील.
74. रेतीघाट शासकीय कामाकरिता शासकीय विभागास राखीव करित असल्यास उत्खनन केलेली रेती/वाळू शासकीय कामावर/प्रकल्पावर वापरणे बंधनकारक राहील.
75. EMP व Mine Closure Plan मधील प्रस्तावित उपाययोजना राबविण्याबाबत व त्यांच्या अंमलबजावणीकरीता लागणारा खर्च रेतीघाट धारकास करावयाचा असल्यामुळे सदर रक्कम सुरक्षा ठेव निधी म्हणून बँक गॅरंटीच्या स्वरुपात कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. व त्याबाबतचे हमीपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. राबविण्यात आलेल्या उपाययोजना व त्यांच्या अंमलबजावणी करीता लागणारा खर्च न केल्यास सदरची सुरक्षा ठेव निधी (EMP COST) जप्त करण्यांत येईल.
76. आदेशात नमुद / मंजुर खोलीपेक्षा जास्त उत्खनन करणार नसल्याचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील तसेच मंजुर खोलीपेक्षा जास्त उत्खनन न होण्याकरिता आवश्यक बेंच मार्क खाणकामाच्या जागेवर तयार करणे अनिवार्य राहील.
77. पर्यावरण दुषित होण्यापासून थांबविण्याकरीता EMP मध्ये समाविष्ट असलेल्या Mobile toilets, Water sprinkler, Solid Waste Management इ. व्यवस्थापन करणे आवश्यक राहील. तसेच वाहतूकीदरम्यान खराब होणाऱ्या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी घाटधारकाची राहील.
78. नदीपात्र/ओढापात्र अथवा त्याच्या परिसरातील वनस्पती व प्राणी यांचे नैसर्गिक रहिवास व प्रजननन यांना कोणताही धोका पोहोचणार नाही याची खबरदारी लिलावधारकांनी घ्यावी .
79. पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्ती नुसार ठेका दिलेल्या एकुण क्षेत्रा इतक्या क्षेत्रावर नदीकाठी अथवा अन्य ठिकाणी वृक्षलागवड करावयाची आहे. पर्यावरण व्यवस्थापन आराखडा नुसार वृक्षारोपण व इतर बाबींची अंमलबजावणी लिलावधारकांनी करावी अन्यथा EMP करीता बँक गॅरंटीची रक्कम शासन जमा करण्यात येईल. EMP नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधीत लिलावधारकांनी ग्राम दक्षता समिती व तहसिल कार्यालया कडून प्रमाणित करुन जिल्हाधिकारी कार्यालयास सादरकरावी.
80. Siltation Study केल्यानंतर जमीनीची धुप थांबविणेसाठी सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी ठेकेदाराने स्वत: विनाशर्त व विनामोबदला करावयाची आहे. तसेच उत्खनन व वाहतुक करतांना जमीनीची धूप होणार नाही याची खबरदारी घ्यावयाची आहे.

81. वाळू/ रेती उत्खननामुळे त्याखालील जमीनीच्या गुणधर्मावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता ठेकेदाराने घ्यावयाची आहे.
82. गौण खनिज उत्खननामुळे पाण्याच्या प्रवाहातील गढूळपणा (Turbidity), वेग व प्रवाहाचा मार्ग यामध्ये कोणताही बदल होणार नाही . याची दक्षता ठेकेदारांनी घ्यावयाची आहे.
83. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व राष्ट्रीय हरीत न्यायाधीकरण (National Green Tribunal) यांचे आदेशाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
84. सांडपाणी निर्माण होत असल्यास त्यावर पर्यावरण व वन्यजीव संरक्षण मंत्रालय, भारत सरकार तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी विहीत केलेल्या प्रमाणकानुसार प्रक्रिया करण्यात यावी.
85. उत्खनन केलेली वाळू/रेती वाहतूक करण्याकरिता वापरण्यात येणारी वाहने सुस्थितीत ठेवणे व त्यासाठी PUC Certificate घेणे बंधनकारक राहील. PUC Certificate नसलेली वाहने वाळू वाहतूकीकरिता वापरता येणार नाही. वाळू उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रातील इंधन / ग्रीस गळतीमुळे प्रदुषण होणार नाही किंवा पाणी दुषीत होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषण होणार नाही याची याची दक्षता ठेकेदाराने घ्यावयाची आहे.. सदरील बाबींचे उल्लंघन केल्यास ठेकेदारास दंडास पात्र राहतील.
86. उत्खनन स्थळावरील तसेच त्याजवळ असलेल्या वस्तीजवळील वातावरणाच्या हवेची गुणवत्ता ही दरवर्षी जानेवारी, एप्रिल व नोव्हेंबर या महिन्यामध्ये तपासण्यात येईल याची गुणवत्ता ही केंद्रिय पर्यावरण व वन्य जीव संरक्षण मंत्रालय,भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे असणे आवश्यक आहे व सदरील अहवाल देण्याची सर्व जबाबदारी लिलावधारकाची राहील.
87. केंद्र शासनाच्या Enforcement & Monitoring Guidelines 2020, व पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालय नवी दिल्ली (MOEF) या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.
88. परवान्यात मंजुर केलेला रेतीसाठा काढुन संपल्यावर किंवा परवान्याची मुदत संपल्यानंतर परवानाधारक परवाना आणि काढुन घेण्यात आलेल्या खनिज मालाचे परीमाण, वाहतुकीचे व ज्यांना माल विकण्यात आला त्या पक्षकाराचे नाव व त्यासाठी मिळालेली किंमत यांचे तपशिल दर्शविणारे संपुर्ण विवरणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याला सादर करेल आणि सक्षम अधिकाऱ्याने छाननी करण्यासाठी मागणी केल्यानुसार कोणतेही तपशिल, नोंदवहया त्याचे कडे सादर करेल.
89. रेतीची वाहतूक करतांना गावातील नागरीकांना त्याचा त्रास होणार नाही किंवा त्यांना जिवीत वा वित्तीय हानी पोहचणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी रेतीघाटधारक यांची राहील. तसेच वापर करण्यात येत असलेले रस्ते खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी अथवा रेती/वाळू वाहतुकीकरीता उपलब्ध झाल्यास गावाचे बाहेरील रस्त्याचा वापर करण्यात यावा तसेच शाळा सुरु होणे व सुटण्याचे वेळी वाहतूक करता येणार नाही.
90. लिलाव धारकाने लिलाव स्थळी काम करण्यासाठी संचलित केलेल्या मजूराबाबत प्रचलित कामगार कायद्याप्रमाणे व अनुषंगीक नियमाप्रमाणे कामकाज करणे आवश्यक राहील.
91. या अटीव शर्ती व्यतीरिक्त एखादी अट निविदेत नमुद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेकडे राखुन ठेवला आहे.
92. **(रेती/वाळू लिलाव - 1 वर्ष कालावधी करीता.)**

लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतरतथा लिलाव प्रक्रिया केल्यानंतर आलेल्या अंतीम बोलीच्या 1/4 रक्कम भरल्यानंतर 30 दिवसांत बोलीची उर्वरित रक्कम भरण्यात येईल, अशा हमीचे दायीत्व स्विकारणा-या दोन व्यक्तींसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपयेé100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकनावर (स्टॅम्प पेपर) करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती/ वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी

शासनावर राहणार नाही. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली 75 टक्के रक्कम 30 दिवसात भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा 7 दिवसात देण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत लिलावाच्या बोलीच्यारक्कम भरण्याची मुदत आणखी 15 दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीची कारणे नोंदवुन, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर 15 टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल.त्यापलीकडे अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब होत असल्यास लिलावाची 3/4 रक्कम भरण्याची मुदत वाढविण्याचे अधिकार शासनास राहतील.

93. लिलावधारकासनियमातनमुदकेल्याप्रमाणे अटी व शर्तीचे व गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदी नुसार असलेले सर्व नियम, वाळू/रेती निर्गत संबंधित शासन निर्णय दि. 3 सप्टेंबर,2019 व शासन/जिल्हाधिकारी यांचे कडील वेळोवेळी निर्गत आदेश/परिपत्रक/सूचना ई. (संबंधीत विभागास लागु असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

94. महाराष्ट्रशासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, यांचे पत्र डिएमएफ-0916/प्र.क्र. 68/उ-9, दिनांक 20/09/2016 नुसार गौणखनिजाच्या संदर्भात स्वामित्वधनाच्या 10 टक्के दराने (रु. 60/- प्रतिब्रास प्रमाणे) जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरिता ना परतावा रक्कम डिमांड ड्राफ्टचे स्वरुपात जमा करावी लागेल.

95. शासनास आवश्यकता भासल्यास रेती घाट रदद करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत तसेच जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

96. उपरोक्त नमूद अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटी किंवा शर्तींचा भंग झाल्यास किंवा पालन न झाल्यास मंजूर करण्यात आलेला रेतीघाट रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(एस.रामामुर्ती,भा.प्र.से.)

**जिल्हाधिकारी बुलडाणा**

परिशिष्ट-1

स्वयंघोषणापत्र

( नोदणी / इच्छुक/ लिलावधारक/ निविदाधारकाने रुपये 100/- चे मुद्रांकीत स्टॅप पेपरवर दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह द्यावयाचे स्वयंघोषणापत्र )

मी नामे (पुर्ण नाव) :- -----------------------------------------------------------------------

राहणार ( पोस्टाचा पुर्ण पत्ता द्यावा):- ---------------------------------------------------------------------

तालुका, जिल्हा :- ---------------------------------------------------------------------

माझे/ माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक :------------------------------ जिएसटी क्रमांक----------------------

मी स्वत: प्रतिज्ञापुर्वक घोषित करतो की, मी रेती घाटाच्या ई - निविदेतील, ई - ऑक्शनमधील सर्व अटी व शर्तीची वाचुन व समजुन घेतल्या आहेत. पर्यावरण विभागाने प्रस्तावित केलेल्या अटी व शर्ती मला बंधनकारक राहतील. मी प्रस्तावित केलेल्या किंमतीत रेतीघाट घेण्यास इच्छुक असून इसारा रक्कमेची 25 टक्के रक्कम मी शासन जमा करीत आहे. लिलावाच्या सर्वोच्च बोलीच्या रक्कमेची ¼ रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या 48 तासाच्या आंत भरेन.मला रेतीघाट मंजूर झाल्यास उर्वरित संपुर्ण 75 टक्के रक्कम मी 30 दिवसांचे आत चलानद्वारे भरणा करुन मंजूर रेतीघाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. तसेच करारपत्रातील सर्व अटी व शर्तीचे पालन करील तसे न केल्यास मी जमा केलेली 25 टक्के रक्कम शासन जमा करण्यात यावी व नियमानुसार दुसऱ्या निविदाधारकास रेतीघाट मंजूर केल्यास अथवा फेरनिविदाद्वारे लिलाव केल्यास तसेच शासनास झालेले नुकसान, जमीन महसूलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्यास माझी काहीच हरकत / तक्रार राहणार नाही याची मला जाणीव आहे.

1. मी असेही घोषित करतो की, संपुर्ण महाराष्ट्र राज्यात रंतीघाट लिलावा संबंधाने काळया यादीत मला समाविष्ट करण्यात आलेले नाही. तसे निदर्शनास आल्यास मी फौजदारी कार्यवाहीस पात्र राहीन.
2. मी असेही घोषित करतो की, सदर लिलाव सुचनेच्या व्याख्येत नमुद "उत्खनन कालावधी " व त्यासह इतर व्याख्या याची पुर्ण जाणीव असून ते मला मान्य व बंधनकारक आहे.
3. मी असेही घोषित करतो की, ज्या रेतीघाटावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली अशा रेतीघाटांपैकी कोणतीही दंडात्मक कार्यवाही माझेवर नाही. गौण खनिजाचे स्वॅामित्वधन , मृतभाटक रक्कम, किंवा शासनाच्या महसुलाच्या रक्कमेचा मी थकबाकीदार नाही. तसेच माझ्यावर कुठलिही थकबाकी नाही.
4. मी असेही घोषित करतो की, लिलाव जाहीरातीतील सर्व सुचना / अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला त्याची जाणीव आहे व त्याचे पालन करणे हे मला बंधनकारक राहील.

ठिकाण :-

दिनांक :-

( )

नोदणीधारकाचे /निविदाधारकाचे

नाव व स्वाक्षरी

**<u>दायित्व स्वाकारणारे दोन व्यक्ती</u>**

1. पुर्ण नाव------------------------------------ स्वाक्षरी--------------------------------------

   संपुर्ण पत्ता--------------------------------------------------------------------------------

2. पुर्ण नाव------------------------------------ स्वाक्षरी--------------------------------------

   संपुर्ण पत्ता--------------------------------------------------------------------------------

## परिशिष्ट-2

### (पंधरवाडी अहवाल)

कालावधी दि.-------------------- ते दि.----------------

रेतीघाटाचे नांव :---------------------------नदीचे नांव----------------------- तालुका -------------------------

लिलावधारकाचे नांव -------------------------------------------------------------------------------------------

पत्ता-------------------------------------------------------------दुरध्वनी क्रमांक-----------------------

| मंजूर परिमाण | नदीपात्रातुन उत्खनन /उचल | साठा / डेपो | विक्री व प्रत्यक्ष विक्री | डेपोतुन विक्री | एकुण विक्री | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | अ+ब | 1-2 |
| 1 | 2 | 3 | 4 | | | 5 |
| | | | | | | |

टिप :- सदरहु अहवाल संबंधित तहसिलदार यांचेकडे नियमित सादर करावा.

# बुलडाणा जिल्हा :- वाळू / रेती ई लिलाव सन 2021-2022

## तहसिलदारांकडुन प्राप्त प्रस्तावांचे अनुषंगाने तालुकास्तरीय तांत्रिक उपसमितीने संयुक्त सर्वेक्षण केल्यानंतर दिलेले योग्य अभिप्राय दिलेल्या रेतीघाटाबाबतचे विवरण

| अ. क्र. | तालुका | ग्राम पंचायतीचे नांव | रेतीघाटाचे नांव | नदीचे नांव | स्थळ निर्देशक गट नं. GSDA ने योग्य दिलेले रेतीघाट | रेतीघाटाचे क्षेत्र (चौ.मी.) | | | रेतीघाटाचे क्षेत्र (हे.आर) | सन २०२१-२२ साठी अंदाजे रेती साठा (ब्रासमध्ये) | सन 2021-22 मध्ये रेतीसाठया-प्रमाणे येणारी सरकारी किंमत (रु.600/- प्रति ब्रास) | सन 2021-2021 चे लिलावा करीता प्रतिब्रास दर (रुपये) | सन 2021-2021 करीता प्रस्तावित अपसेट प्राईसची रक्कम (रुपये) | लिलावात भाग घेणा-या व्यक्तीने भरावयाची अनामत रक्कम (अपसेट प्राईजच्या 25%) | निविदा अर्ज फी व प्रोसेसिंग शुल्क भरणा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | लांबी | रुंदी | खोली | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 18 | 19 | 20 | 21 |
| **सकाळचे सत्र** | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | बुलडाणा | म्हसला बु. | म्हसला बु. | धामना | म्हसला बु-26,27,29,<br>म्हसला खुर्द-193,194,192,189, | 336 | 30 | 0.40 | 1.00 | 1425 | 855000 | 2299 | 3276075 | 819080 | 6947 |
| 2 | देऊळगांवराजा | दिग्रस बु. | दिग्रस बु. | खडकपुर्णा | GSDA योग्य-450, | 350 | 45 | 0.60 | 1.57 | 3339 | 2003400 | 2299 | 7676361 | 1919100 | 6947 |
| 3 | देऊळगांवराजा | नारायणखेड व निमगांव गुरु | नारायणखेड व निमगांव गुरु | खडकपुर्णा | GSDA योग्य- नारायणखेड- 166 ते 172,184 ते 188,<br>निमगांव गुरु- 39 ते 45,50,51, | 710 | 50 | 1.00 | 3.55 | 12544 | 7526400 | 2299 | 28838656 | 7209670 | 6947 |
| 4 | सिंदखेडराजा | देवखेड लिंगा, पिंपळगांव कुडा, | देवखेड-लिंगा | खडकपुर्णा | देवखेड- 3, 4,7, 19 ते 21,26,<br>लिंगा-14,25,26,29,30,31, | 400 | 60 | 2.00 | 2.40 | 16961 | 10176600 | 2299 | 38993339 | 9748340 | 6947 |
| 5 | सिंदखेडराजा | निमगांव वायाळ | निमगांव वायाळ | खडकपुर्णा | निमगांव वायाळ-299, 301 ते 303,316 ते 319, | 600 | 50 | 2.00 | 3.00 | 21201 | 12720600 | 2299 | 48741099 | 12185300 | 6947 |
| 6 | सिंदखेडराजा | हिवरखेडपुर्णा | हिवरखेडपुर्णा | खडकपुर्णा | हिवरखेड पुर्णा- 4 ते 7,,300 ते 305,<br>तढेगांव- 54 ते 62, | 450 | 100 | 1.00 | 4.50 | 15901 | 9540600 | 2299 | 36556399 | 9139100 | 6947 |
| 7 | सिंदखेडराजा | तढेगांव | तढेगांव | खडकपुर्णा | तढेगांव- 422 ते 425,429,430,436,<br>437,438,448,, | 600 | 50 | 2.00 | 3.00 | 21201 | 12720600 | 2299 | 48741099 | 12185300 | 6947 |
| 8 | सिंदखेडराजा | साठेगांव | साठेगांव | खडकपुर्णा | साठेगांव -118 ते 122,125 ते 127, | 300 | 40 | 1.00 | 1.20 | 4240 | 2544000 | 2299 | 9747760 | 2436960 | 6947 |
| 9 | लोणार | सावरगांवतेली, चांगेफळ | सावरगांवतेली, चांगेफळ | खडकपुर्णा | चांगेफळ-135,136,131 ते 133,128, 125,93,92,<br>सावरगांवतेली-69 ,73,75,78,79,85,88 ते 91, | 500 | 40 | 0.50 | 2.00 | 3533 | 2119800 | 2299 | 8122367 | 2030600 | 6947 |
| 10 | लोणार | सावरगांवतेली | सावरगांवतेली | खडकपुर्णा | 47,46,45,43,42, | 500 | 35 | 0.50 | 1.75 | 3092 | 1855200 | 2299 | 7108508 | 1777130 | 6947 |
| 11 | नांदुरा | पातोंडा | पातोडा | पुर्णा | 1,270 ते 273,281 ते 284, | 400 | 25 | 0.50 | 1.00 | 1767 | 1060200 | 2299 | 4062333 | 1015600 | 6947 |
| 12 | नांदुरा | भोटा | भोटा | पुर्णा | 184 ते 191, | 600 | 30 | 0.60 | 1.80 | 3816 | 2289600 | 2299 | 8772984 | 2193250 | 6947 |

| अ. क्र. | तालुका | ग्राम पंचायतीचे नांव | रेतीघाटाचे नांव | नदीचे नांव | स्थळ निर्देशक गट नं. GSDA ने योग्य दिलेले रेतीघाट | रेतीघाटाचे क्षेत्र (चौ.मी.) | | | रेतीघाटाचे क्षेत्र (हे.आर) | सन २०२१-२२ साठी अंदाजे रेती साठा (ब्रासमध्ये) | सन 2021-22 मध्ये रेतीसाठया-प्रमाणे येणारी सरकारी किंमत (रु.600/- प्रति ब्रास) | सन 2021-2021 चे लिलावा करीता प्रतिब्रास दर (रुपये) | सन 2021-2021 करीता प्रस्तावित अपसेट प्राईसची रक्कम (रुपये) | लिलावात भाग घेणा-या व्यक्तीने भरावयाची अनामत रक्कम (अपसेट प्राईजच्या 25%) | निविदा अर्ज फी व प्रोसेसिंग शुल्क भरणा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | लांबी | रुंदी | खोली | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 18 | 19 | 20 | 21 |
| | | | | | दुपारचे सत्र | | | | | | | | | | |
| 13 | नांदुरा | हिंगणभोटा | रोटी-अ | पुर्णा | 1 ,2,3, 4, | 750 | 20 | 0.60 | 1.50 | 3180 | 1908000 | 2299 | 7310820 | 1827720 | 6947 |
| 14 | नांदुरा | हिंगणभोटा | रोटी-ब | पुर्णा | 124 ते 128, | 600 | 20 | 0.60 | 1.20 | 2544 | 1526400 | 2299 | 5848656 | 1462170 | 6947 |
| 15 | नांदुरा | येरळी | येरळी | पुर्णा | 20 ते 26, | 600 | 30 | 0.60 | 1.80 | 3816 | 2289600 | 2299 | 8772984 | 2193250 | 6947 |
| 16 | जळगांवजामोद | मानेगांव | मानेगांव | पुर्णा | 36,359,357,355, | 600 | 30 | 0.50 | 1.80 | 3180 | 1908000 | 2299 | 7310820 | 1827720 | 6947 |
| 17 | जळगांवजामोद | दादुलगांव | दादुलगांव | पुर्णा | 135,138 ते 144, | 575 | 30 | 0.50 | 1.72 | 3048 | 1828800 | 2299 | 7007352 | 1751840 | 6947 |
| 18 | जळगांवजामोद | हिंगणाबाळापूर | हिंगणाबाळापूर | पुर्णा | 29,28,23 ते 25,3, | 550 | 30 | 0.50 | 1.65 | 2915 | 1749000 | 2299 | 6701585 | 1675400 | 6947 |
| 19 | जळगांवजामोद | गोळेगांव बु. | गोळेगांव बु. | पुर्णा | 11, 19 ते 22,25,27, | 450 | 30 | 0.50 | 1.35 | 2385 | 1431000 | 2299 | 5483115 | 1370780 | 6947 |
| 20 | जळगांवजामोद | झाडेगांव | झाडेगांव | पुर्णा | 173 ते 181, | 705 | 20 | 0.50 | 1.41 | 2491 | 1494600 | 2299 | 5726809 | 1431710 | 6947 |
| 21 | जळगांवजामोद | गोळेगांव खु. | गोळेगांव खु. | पुर्णा | 77 ते 81, | 518 | 25 | 0.40 | 1.29 | 1830 | 1098000 | 2299 | 4207170 | 1051800 | 6947 |
| 22 | जळगांवजामोद | भेंडवळबु. | भेंडवळबु. | पुर्णा | 324 ते 326,311, | 518 | 30 | 0.50 | 1.55 | 2746 | 1647600 | 2299 | 6313054 | 1578270 | 6947 |
| 23 | संग्रामपुर | पेसोडा | इटखेड | पुर्णा | 28,41,42,45,46, 47,52, | 1600 | 10 | 0.50 | 1.60 | 2827 | 1696200 | 2299 | 6499273 | 1624820 | 6947 |
| 24 | शेगांव | बोडगांव | बोडगांव | पुर्णा | 173,177,180,185,194,4 ते 7, | 780 | 15 | 1.00 | 1.17 | 4134 | 2480400 | 2299 | 9504066 | 2376050 | 6947 |
| 25 | शेगांव | भोनगांव | भोनगांव | पुर्णा | GSDA योग्य- 1, 7,ते 10, | 668 | 15 | 1.00 | 1.00 | 3540 | 2124000 | 2299 | 8138460 | 2034650 | 6947 |
| | एकुण | | | | | | | | | 147656 | 88593600 | | 339461144 | 84865610 | |

(डॉ.वि.प.राठोड)
जिल्हा खनिकर्म अधिकारी,बुलडाणा

(धनंजय गोगटे)
अपर जिल्हाधिकारी,बुलडाणा

(एस.राममुर्ती,भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी,बुलडाणा